# अधिसूचना

गृह विभाग,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- 400 032.
दिनांक:- 15 सप्टेंबर, 2020.

महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम

क्रमांक - एमव्हीडी 0620/प्र.क्र.72/परि-3 :-

ज्याअर्थी, कोविड-19 विषाणू प्रादुर्भावामुळे केंद्र शासनाने दि. 25 मार्च, 2020 पासून संपूर्ण देशभर टाळेबंदी लागू केली आणि महाराष्ट्र राज्यात नोंदणीकृत झालेल्या आणि वार्षिक कर भरणा करणाऱ्या परिवहन वाहनांना, ज्यांनी 31 मार्च, 2020 पर्यंतचा कर भरणे आवश्यक होते, अशा परिवहन संवर्गातील वाहन मालकांना दिलासा देणे आवश्यक होते;

त्या अर्थी, महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियमाच्या (1958 चा 65) कलम 13 चे उपकलम (2) मधील तरतूदीन्वये दिलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासन, खालील तक्त्यातील स्तंभ (2) मधील नमूद वाहनांना दि. 1 एप्रिल, 2020 ते 31 मार्च, 2021 या कालावधीत स्तंभ (4) मधील अटींच्या अधिन स्तंभ (3) मधील नमूद मर्यादेच्या प्रमाणात करामध्ये सूट देत आहे.

| अ.क्र. | वाहनांचे प्रकार | वार्षिक करातील सूटीची मर्यादा | अट |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1. | वार्षिक कर भरणा करणारी मालवाहतूक वाहने | 50% | जर वाहन मालकाने मागील वर्षाचा वार्षिक कर दि. 31 मार्च, 2020 रोजी किंवा पूर्वी भरणा केला असेल तर. |
| 2. | वार्षिक कर भरणारी पर्यटक वाहने | 50% | |
| 3. | खनित्रे | 50% | |
| 4. | खाजगी सेवा वाहने | 50% | |
| 5. | व्यावसायिक कॅंपर्स वाहने | 50% | |
| 6. | शालेय विद्यार्थी वाहतूक बस / वाहने | 50% | |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(प्रकाश सांबळे)
शासनाचे उप सचिव

उप सचिव
गृह विभाग, महाराष्ट्र श

कोविड-१९ या विषाणूमुळे उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीमुळे वार्षिक कर भरणाऱ्या कंत्राटी वाहनांना करमाफी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
**शासन परिपत्रक क्र.एमव्हीडी-०६२०/प्र.क्र.७२/परि-३**
२ रा मजला, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- ०४ नोव्हेंबर, २०२०.

संदर्भ: १) शासन अधिसूचना दि.१५/९/२०२०.
२) शासनाचे समक्रमांकाचे दि.२१/९/२०२० चे पत्र.
३)परिवहन आयुक्त कार्यालयाचे क्र.पआका/का.३/कोविड-१९/करमाफी (कंत्राटीवाहने)/ ६६/२०२०/जा.क्र.७६१५,दि.२१/९/२०२० चे पत्र.
४)परिवहन आयुक्त कार्यालयाचे क्र.पआका/का.३/कोविड-१९/करमाफी (कंत्राटीवाहने)/ ६६/२०२०/जा.क्र.७६१५,दि.२५/९/२०२०चेपत्र.
५) शासन अधिसूचना दि.३०/९/२०२०.
६) शासन समक्रमांकाचे दि.३०/९/२०२० चे पत्र.
७) शासनाचे समक्रमांकाचे दि.५/१०/२०२० चे पत्र.
८) परिवहन आयुक्त कार्यालयाचे क्र.पआका/का.३/कोविड-१९/करमाफी(कंत्राटी वाहने)/ ६६/२०२०/जा.क्र.८१००, दि.७/१०/२०२० चे पत्र.
९)परिवहन आयुक्त कार्यालयाचे क्र.पआका/का.३/कोविड-१९/करमाफी(कंत्राटी वाहने)/ ६६/२०२०/जा.क्र.८१००, दि.१४/१०/२०२० चे पत्र.

शासन परिपत्रक:-

कोविड-१९ आजारमुळे राज्यात उद्भवलेल्या परिस्थितीमध्ये वार्षिक कर भरणाऱ्या कंत्राटी वाहनांना करमाफी देण्याबाबत मंत्रिमंडळाने **"राज्यामध्ये वार्षिक कर भरणाऱ्या वाहनांना दि.१/४/२०२० ते दि.३०/९/२०२० या सहा महिन्यांच्या कालावधीत कर भरण्यापासून १००% करमाफी म्हणजे सन २०२०-२१ या वर्षासाठी एकूण वार्षिक कराच्या ५०% करमाफी देण्यास मान्यता देण्यात यावी."** असा निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार शासनाने दि.१५/९/२०२० व दि.३०/९/२०२० रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे.

२. यानुषंगाने कळविण्यात येते की, जर वाहन धारकाने एप्रिल २०२० ते सप्टेंबर २०२० या कालावधीचा कर भरला असल्यास तो पुढील कालावधीकरीता म्हणजे ऑक्टोबर २०२० ते मार्च २०२१ या कालावधीसाठी देय करात समायोजित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच, जे वाहन मालक दि.३१/३/२०२० पर्यंतचा थकित कर दि.३१/१२/२०२० पर्यंत दंड व्याजासह भरतील त्यांनासुध्दा करमाफीची सवलत अनुज्ञेय राहील.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२०११०४१४४२१७८८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DEEPAK UTTAMRAO POKALE

Digitally signed by DEEPAK UTTAMRAO POKALE
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=HOME DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=856b31c793b12e4f22cb247c5cff7f3358867f2482aa2234f6131bf8940dbd2e, serialNumber=f4163205e7b4960cc7ca6f973d6deb06502b2e8fc47a411babcf42a0e99cf34b, cn=DEEPAK UTTAMRAO POKALE
Date: 2020.11.04 14:45:12 +05'30'

**(दिपक पोकळे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत माहितीस्तव,**

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई.
२. मा.उप मुख्यमंत्री महोदयांचे सचिव,मंत्रालय,मुंबई.
३. मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
४. मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (परिवहन), यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई.
६. सर्व प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालये.
७. निवड नस्ती (परिवहन-३).